I J R S S I S, Vol. VIII, Issue (3), May-2022 : 237-241 e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
A Double-Blind Peer Reviewed Journal OPEN ACCESS Original Article
Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATIONwww.ijrssis.in

# नागपूर जिल्हयातील हेमाडपंती मंदिर स्थापत्यशैलीचे ऐतिहासिक अध्ययन

डॉ. प्रज्ञा भा. कामडी

इतिहास विभाग प्रमुख
नगर परिषद षिवाजी महाविद्यालय मोवाड, त. नरखेड जि. नागपूर महाराष्ट्र

Communicated : 06.04.2022 | Revision : 08.04.2022 Accepted : 15.04.2022 | Published : 02.05.2022

**सारांश :**

भारतीय स्थापत्यषैलीचे अनेक प्रकार आहे.त्यापैकी एक प्रमुख शैली म्हणजे हेमाडपंती शैली होय.महाराष्ट्रात देवगिरी येथे यादवांचे राज्य होते. इ.स. १२५९ ते १२७४ या काळात मुख्य प्रधान राहलेल्या हेमांद्री पंडित किंवा हेमाडपंत यांनी या प्रकारच्या इमारत बांधणीचा महाराष्ट्र आणि दख्खन पठारावर अनेंक ठिकाणी उपयोग केल्याने ही बांधणी पध्दत त्यांच्या नावावरून हेमाडपंती म्हणून ओळखली जाते. प्रस्तुत निबंधात नागपूर जिल्हयातील हेमाडपंती मंदिर स्थापत्यशैलीचे ऐतिहासिक अध्ययन करून हेमाडपंती स्थापत्य षैलीवर प्रकाष टाकण्यात आला आहे.

**बीजशब्द :** हेमाडपंती, स्थापत्य षैलीए नागपूर जिल्हा, मंदिर रचना

**प्रस्तावना :**

भारताचा सांस्कृतिक इतिहास विविधतेने नटलेला आहे.या इतिहासात विविध कलांना अत्यंत महत्वपूर्ण स्थान आहे. भारताचा इतिहास पाहला तर तिस—या चौथ्या षतकापासून च्या अनेक ग्रथात चित्रकला मुर्तिकला इ. अनेक कलांचा उल्लेख आपल्याला आढळतो.प्राचीन भारताने एक संपन्न सांसकृतिक वारसा आपल्यासमोर ठेवलेला आहे.आणि हा वारसा भारतापुरता मर्यादित न राहता आग्नेय आशिया मध्य आशिया इ. अनेक देशांवर त्याचा प्रभाव पडून भारताच्या सांस्कृतिक ठेवाला जागतिक जागतिक दर्जा प्राप्त झाला.अनेक देशात सापडलेली शिलालेख नाणी भारताच्या धर्तीवर वैशिष्ट्पूर्ण आहे. भारताच्या स्थापत्यकलेतील अत्यंत महत्वाचा प्रकार म्हणजे मंदिर स्थापत्य.इ.स. च्या चौथ्या पाचव्या शतकापासून मंदिराचे अवशेष आढळत असले तरी त्यापुर्वीच्या काळातही मंदिर कला असतित्वात असल्याचे पुरावे आहे.

**हेमाडपंती मंदिरांचा इतिहास :**

भारतीय स्थापत्यशैलीचे अनेक प्रकार आहे.त्यापैकी एक प्रमुख शैली म्हणजे हेमाडपंती शैली होय.महाराष्ट्रात देवगिरी येथे यादवांचे राज्य होते. इ.स. १२५९ ते १२७४ या काळात मुक्ष्य प्रधान राहलेल्या हेमांद्री पंडित किंवा हेमाडपंत यांनी या प्रकारच्या इमारत बांधणीचा महाराष्ट्र आणि दख्खन पठारावर अनेंक ठिकाणी उपयोग केल्याने ही बांधणी पध्दत त्यांच्या नावावरून हेमाडपंती म्हणून ओळखली जाते.हिंदू धर्माच्या प्रचारासाठी जवळपास तिनशे मंदिरे हेमपंथने बांधली. या पध्दतीने म्हणजेच मंदिरांचे हेमाडपंथी पध्दतीने झालेले बांधकाम टिकून राहले.आणि त्यामुळे आजही अभ्यासकांना उपलब्ध आहे.ही हेमाडपंती मंदिरे भारताचा सांस्कृतिक अनमोल ठेवा आहे. इतिहासाच्या अभ्यासकांना एक मेजवानीच आहे. इमारत बांधत असताना दगडामध्ये चुना किंवा इतर न भरता दगडच वेगवेगळया कोनामध्ये कापुन त्यानाच खुंटया व खाचा पाडून ते एकमेकांत घट्ट बसू शकतील अशी रचना केली जाते.मंदिराच्या पायापासून तर शिखरापर्यंत ही दगड एकमेकांत गुंफून केलेली रचना एकसंघ आणि टिकाउ बनते.महाराष्ट्रात अशी अनेक मंदिरे आपल्याला आजही पहायला मिळतात.

**हेमाडपंती मंदिरांची रचना :**

हेमाडपंती मंदिरांचे दोन कालखंडात विभाजन केले जाते. अकरा ते तेराव्या शतकातील मंदिर. व दुसरे १२५० ते १३५० या काळातील मंदिरे. अकरा ते तेराव्या शतकातील मंदिरांवर विपूल प्रमाणात शिल्पांकन असून नंतरच्या मंदिरांवर तुरळक शिल्पांकन दिसते. या पध्दतीत दगड साधण्यासाठी चुना व तत्सम द्रव्य वापरलेले आढळत नाही. काती व दगडांना खाचा वा खोबणी पाडून एकावर एक दगड रचून भितींनी बांधणी केलेली असते. काही मंदिरात मुख्य गर्भगृह व्यतिरिक्त आणखी दोन स्वतंत्र गर्भगृह अंतरालय सभागृह व प्रवेशमंडप असे स्वतंत्र भाग असतात. क्वचित ठिकाणी उपगर्भगृहेही असतात. सामान्त: एकच प्रवेशद्वार असते. काही मंदिरांना तीन द्वारे व प्रवेशमंडप असतो. या मंदिर समुहात गोंदेश्वर येथील एकमेव मंदिर पंचायतन शैलीत बांधलेले आहे.

हेमाडपंती मंदिराचे बांधकाम विशेषत: स्तंभशीर्षे कीचक कमळ व क्वचित पर्णाची आहेत. स्तंभातील कर्णिका किंवा कणी ही मंदिरस्तंभांची एक खास देणगी होय. या स्तंभांवरील मधल्या पट्टीत मूर्ती वा भौमितिक आकृतिबंध

कोरलेले आहेत. त्याखाली कधी गोलाकार पाया किंवा चौकोनी बैठक असते. नगर जिल्ह्यातील पेडगावच्या लक्ष्मीनारायण व वाघळीच्या मुथादेवी मंदिरांतील स्तंभ अनुक्रमे कुंभाकृती व पुष्पाकृतीयुक्त सोळंकी पद्धतीचे वाटतात. मात्र पाटण महेश्वर व किकली सातारा जिल्हा येथील भैरवनाथ मंदिरांचे स्तंभ पूर्णत: यादव म्हणजेच हेमाडपंती वास्तुशैलीचे आहेत. काही ठिकाणी भित्तिस्तंभ आहेत. त्यावरही कलाकुसर आढळते.

छतांप्रमाणेच या मंदिरांच्या द्वारशाखा अलंकृत केलेल्या आहेत आणि त्यांवरील गणेशपट्टी व तिच्या सोबतच्या भागात कोरलेल्या मातृकामूर्तीव इतर देवदेवता त्यांच्या लांछनासह खोदलेल्या असतात. उंबरठ्यावर कीर्तिमुखे मकर व कमळ ही प्रतिमाने प्रामुख्याने कोरलेली असते. या सुरुवातीच्या हेमाडपंती यादव मंदिरांच्या मंडोवरावर बाहेरच्या भिंतींवर विपुल शिल्पांकन असून स्तंभ द्वारशाखा तोरण छत आणि शिखर यांवरील शिल्पांकनापेक्षा हे तुलनात्मक दृष्ट्या जास्त असून बहुतेक मंदिरांतून देवादिकांच्या मूर्ती जेवढ्या सुडौल व सुंदर करता येतील तेवढ्या करण्याचा प्रयत्न शिल्पकाराने केला आहे. या मूर्तिसंभारात प्रामुख्याने पौराणिक देवदेवतांबरोबर दशावतार महाभारत रामायण कृष्णलीला यांची कथात्मक शिल्पे आणि सुरसुंदरी यांचे शिल्पांकन असतात. तद्वतच काही ठिकाणी कामशिल्पे वास्तुकला आणि शिल्पकला यांतील परिपूर्ण सुसंगती राखण्याचा प्रयत्न केला आहे.किंबहुना वास्तुशैली आणि शिल्पशैली यांचा सुंदर मिलाफ या मंदिराच्या बांधणीत दृग्गोचर होतो. सुरुवातीची ही मंदिरे हीच एक सुंदर शिल्पाकृती भासते. शिल्पाला वास्तुरचनेच्या विशिष्ट बांधणीमुळे एक प्रकारचा उठाव मिळाला आहे. प्रारंभीच्या काळात अकरावे—बारावे शतक प्रतिमा उठावदार करण्याकडे वास्तुविशारदांचा कल होता. त्यामुळे ती मंदिरे शिल्पांनी अलंकृत आढळतात. परंतु नंतरच्या काळात हेमाडपंती मंदिरांचे बांधकाम पूर्णत: वास्तुरचनेला प्राधान्य देऊन झाल्यामुळे प्रतिमा निर्मितीकडे कलाकारांचे दुर्लक्ष झाले आणि ठोकळेवजा वास्तूंची बांधणी झाली. पुढे ती सतराव्या—अठराव्या शतकांत मराठा मंदिराच्या बांधणीत विशेषत्वाने दृग्गोचर होते. कारण त्यांची वास्तुशैली हेमाडपंती आहे.

नागपूरपासून ४२ किलोमीटर अंतरावर सावनेर हे तालुक्याचे ठिकाण आहे. या सावनेर पासून अवघ्या एक किलोमीटर अंतरावर हे हेमाडपंथी शिवमंदिर आणि तिथले वाळूचे अत्यंत प्राचीन शिवलिंग म्हणजे पंचक्रोशीतील लोकांचे ग्रामदैवत. कोलार नदीच्या काठावर वसलेले हे मंदिर ११ व्या शतकातील असून याचे अनेक धार्मिक, पौराणिक, ऐतिहासिक दाखले आहेत. हेमाद्री कारागिरांनी हेमाडपंथी शैलीत निर्माण केलेले टुमदार मंदिर जागृत देवस्थान म्हणून ओळखले जाते. पौराणिक महत्त्व पौराणिक पुराव्यानुसार, तसेच ही यमराजाची सासुरवाडी असल्याची आख्यायिका आहे. या ठिकाणी द्वापर युगात पांडवांच्या काळात शिवलिंग स्थापित करण्यात आल्याचे सांगितले जाते.

जैमिनी अश्वमेघ या पौराणिक ग्रंथानुसार सावनेरचे परिसर 'सास्वत:पुर' म्हणून ओळखले जात असे. द्वापर युगात महाभारताचे युद्ध जिंकल्यानंतर पांडवांनी अश्वमेघ यज्ञ केला. दिग्वीजयावर निघालेल्या पांडवांना याच ठिकाणी वीरवर्मा राजाच्या पाच मुलांनी आवाहन दिले. युद्धात पाचही मुलांच्या मृत्यूनंतर त्यांची बहीण मालिनीने युद्ध सुरु ठेवले, आणि विजयासाठी स्वत:च्या हातांनी वाळूचे शिवलिंग निर्माण करुन तपश्चर्या केली. मालिनीच्या तपश्चर्येमुळे श्रीकृष्णांनी हस्तक्षेप करत युद्ध थांबविले आणि नारदाच्या मदतीने मालिनीचा विवाह यमराजासोबत लावून दिला. तेव्हापासून या ठिकाणी मालिनीने स्थापन केलेल्या वाळूच्या शिवलिंगाची पूजा केली जाते. तसेच हे ठिकाण यमराजची सासुरवाडी म्हणून ही प्रसिद्ध आहे. ११ व्या शतकात हेमाद्री कारागिरांनी हेमाडपंथी मंदिराची निर्मिती केली. काही कालावधीनंतर या ठिकाणी असलेले जुने मंदिर नष्ट झाले आणि ११ व्या शतकात हेमाद्री कारागिरांनी हेमाडपंथी पद्धतीने वर्तमान मंदिर उभारले. हेमाडपंथी कारागिरांप्रमाणेच मंदिराची बांधणी अगदी साधी, कमी कलाकुसर आणि कमी शिल्प असलेली आहे. मंदिरात सभामंडप, अंतराळ आणि गर्भगृह अशी तिहेरी रचना असून मंदिर कोलार नदीच्या काठावर पश्चिमाभिमुख वसलेले आहे. प्रवेशद्वारावर गणेशाची प्रतिमा आहे, तर गर्भगृहात प्राचीन शिवलिंग आहे. परिसरातील अनेक लोक वर्षानुवर्षे नित्यनेमाने या मंदिरात येत असून या ठिकाणी मनोकामना पूर्ण होतात, अशी भाविकांचे मान्यता आहे. शिवाय अनेक भाविक हे जागृत शिवलिंग असल्याची प्रचिती आल्याचे दावे ही करतात. ऐतिहासिक महत्त्व या मंदिराचे ऐतिहासिक दाखले देखील मिळतात. मोगल सम्राट औरंगजेबच्या सैन्याने या परिसरात अनेक मंदिरे उध्वस्थ केली होती. त्याकाळी या शिवमंदिराचे ही नुकसान करण्यात आले होते. त्यामुळे तेव्हाचे भग्नावशेष आजही या भागात पाहायला मिळतात. या शिवमंदिरात सावनेर तालुक्यातील भाविकांसह संपूर्ण जिल्ह्यातून लोकं दर्शनाला येतात. दर सोमवारी तसेच शिवरात्रीला या ठिकाणी विशेष पूजा आयोजित केली

जाते. शिवाय परिसरातील नागरिकांकडून दररोज सकाळ संध्याकाळ भजन, कीर्तन असे कार्यक्रम सुरु असतात.

**आदासा :**

महाराष्ट्रातील नागपूर जिल्ह्यातील सावनेर तालुक्यातील आदासा हे एक गाव आहे. हे गाव तेथील गणेश मंदिरामुळे प्रसिध्द आहे. नागपूर शहरापासून आदासा मंदिर नागपूर ते कळमेश्वर महामार्गावर असून अंदाजे †७ किमी. अंतरावर आहे.नागपूर छिंदवाडा लोहमार्गावर पाटणसावंगी या स्थानकापासून दहा कि.मी. अंतरावर आदासा हे क्षेत्र आहे. एका उंच टेकडीवर हे पुरातन हेमाडपंती गणेश मंदिर असून ही मूर्ती नृत्यगणेशाची आहे. या मंदिराचे वैशिष्ट म्हणजे येथील शंकराच्या मंदिरात असलेली पिंड दक्षिणाभिमुख आहे. इतर पिंडी उत्तराभिमुख असतात व गणेशमूर्ती उजव्या सोंडेची आहे. महापाप, संकष्ट, आणि शत्रू या तीन दानवांनी जगाला त्राही त्राही करून सोडले होते. या दानवांच्या तावडीतून सुटका करून घेण्यासाठी सर्व देवांनी शंकर–पार्वतीरूपी असलेल्या शमीच्या वृक्षाखाली गणेशाची आराधना केली. तेव्हा त्या वृक्षाच्या मुळापासून शमी विघ्नेश प्रकट झाला आणि त्याने त्या तीनही दानवांचा संहार केला. ज्या स्थळी ही कथा घडली त्या ठिकाणी मुदगल ऋषींनी गणेशमूर्तीची स्थान केली. तेच हे अदोष क्षेत्र. गणेशाच्या ह्यद्य स्थानांपकी हे एक जागृत गणेश स्थान आहे. येथे माघ शुद्ध चतुर्थीला मोठा उत्सव असतो. टेकडीवरील गणेशमंदिरात असलेल्या गणपतीच्या मूर्तीला शमी विघ्नेश म्हणतात. ती महाराष्ट्रातील सर्वात उंच गणेशमूर्ती आहे ही जवळपास ६ मीटर उंच असून या मंदिराचे बांधकाम हेमाडपंती आहे. मंदिर टेकडीवर वसलेले असल्याने तेथून आजूबाजूचा परिसरला नयनरम्यता प्राप्त झाली आहे. मंदिरात गणेशाची देखणी अशी भव्य स्वयंभू गणेश मुर्ती आहे. आदासा येथील गणेशाचे दर्शन घेण्याकरिता हजारो भाविक येथे रोज येतात.

**सिताबर्डी नागपूर टेकडी मंदिर :**

विदर्भाच्या अष्टविनायकातील पहिला गणेश समजला जातो तो म्हणजे नागपूरचा टेकडी गणेश. नागपूरकरांचे हे आराध्य दैवत आहे. रेल्वे स्थानकाला लागून सीतबर्डी टेकडीवर हे गणेशाचे मंदिर आहे. त्यामुळे टेकडीचा गणपती म्हणूनच तो ओळखला जातो. हे मंदिर सुरवातीला हेमाडपंती होते. काळाच्या ओघात बराचसा भाग नष्ट झाला. टेकडी गणेश मंदिर हे भगवान गणेशाला समर्पित एक प्रसिद्ध हिंदू मंदिर आहे. हे मंदिर असून ते नागपूरच्या प्राचीन मंदिरांपैकी एक आहे. हे मंदिर नागपूरच्या मध्यभागी असून नागपूर रेल्वे स्थानकापासून जवळ आहे. श्रीगणेशाची मूर्ती (स्वयंभू) असल्याचे मानले जाते. या मूर्तीची उंची सुमारे चार फूट आहे. मूळची मूर्ती खूपच लहान असल्याचे म्हटले जाते, परंतु हळूहळू आकाराने ती मोठी होत असल्याचे मानले जाते. मूर्ती विशेषत: कपाळावर अनेक सोन्या–चांदीचे दागिने सजवलेली दिसते. मुकुट नावाचा एक विशिष्ट अलंकार आहे जो फक्त चतुर्थी आणि एकादशीच्या शुभ प्रसंगी परिधान करतात.

**मंदिराचा इतिहास :**

भोसले राजे आणि ब्रिटिशांची लढाई ज्या ठिकाणी झाली, त्याच ठिकाणी हे गणपतीचे मंदिर आहे. सुरुवातीला मंदिर छोटेसे होते, आता त्याचा विकास झाला आहे. मंदिराचे मुख्य प्रवेशद्वार पूर्वेला असले, तरी मूर्ती उत्तराभिमुख आहे. गणपतीच्या मूर्तीच्या पाठीमागील भिंतीला लागून एक शिवलिंग आहे. येथील वैशिष्ट्य म्हणजे शिवलिंगाच्या ठिकाणी नंदी बसवलेला दिसतो.याच टेकडीवर दुसऱ्या भागात आणखी एक गणपती मंदिर आहे. तो फौजी गणपती म्हणून ओळखला जातो. शुक्रवार तलावाचे पाणी पूर्वी सीताबर्डी किल्ल्यापर्यंत होते. भोसले राजे नावेतून तेथे गणेश दर्शनासाठी येत, असे सांगितले जाते. येथील गणेशामूर्ती भोकरीच्या झाडाखाली उघड्यवर होती. या ठिकाणी पूर्वी मोठे मंदिर होतेय परंतु नंतर ते उद्धवस्त झाले. त्याचे अवशेष आजही दिसतात. मंदिराच्या आसपास वड–पिंपळाची झाडे आहेत. ही मूर्ती उजव्या सोंडेची असून दोन पाय, चार हात, डोके, सोंड पूर्वी स्पष्ट दिसत असे. आता शेंदराच्या पुटांमुळे मूर्ती स्पष्ट दिसत नाही. या बैठ्या मूर्तीची उंची साडेचार फूट व रुंदी तीन फूट आहे. मूर्तीच्या मागे पिंपळाचे झाड आहे. त्याच्या मुळांमुळे मूर्ती मूळ जागेहून थोडी पुढे सरकली असावी, असा तर्क आहे.

१९७० च्या दशकात लष्कराच्या ताब्यात येण्यापूर्वी प्राचीन टेकडी गणेश मंदिराची सुरुवात मूर्तीसह सामान्य टिन शेडपासून झाली. सैन्याने आपल्या संरचनेत किरकोळ सुधारणा केल्याचे सांगितले जाते. परंतु मंदिराच्या संरचनेत मोठे बदल १९७८ च्या सुमारासच झाले. मंदिर बांधण्याचा मोठा प्रकल्प भक्तांनी दिलेल्या उदार देणग्यांमधून हाती घेण्यात आला. या मंदिराची आजची रचना दिवंगत श्री गणपतराव जोशी आणि इतर काही भक्तांनी बांधली होती. मंदिर व्यवस्थापनाला नंतर लक्षात आले की मंदिर परिसराचा विस्तार करण्याची गरज आहे, कारण मंदिरात येणाऱ्या भाविकांच्या वाढत्या संख्येला ते सामावून घेण्यास सक्षम नव्हते. अशा प्रकारे त्यांनी संरक्षण मंत्रालयाला विनंती केली ज्याने त्यांना २०,००० चौरस फूट अधिक जमीन घेण्यास मदत केली. कपूर बावडी मंदिर हे सर्वात

प्राचीन काळातील एक नागपूर जिल्ह्यातील रामटेक शहरात वसलेल्या महाराष्ट्रातील सर्व मंदिरांपैकी एक मानले जाते. ही रामटेकमधील तीन बाओलीं (बावडी) पैकी एक आहे. हे एक प्राचीन मंदिर आणि पायरी विहीर आहे. स्थानिक लोकांच्या माहितीनुसार, मंदिर सुमारे १,२०० वर्षे जुने आहे. केवळ स्थानिकच नव्हे, तर वास्तुकला आणि रचनाही याची साक्ष देतात. दुर्मिळ चमकदार दगड हे कॉनचे मुख्य आकर्षण आहेत.

कर्पूर बाओली ही चामुंडा, भैरवी, इंगलज, काली, रणचंडी आणि कपूर्ता या ६ देवींना समर्पित आहे. हे गर्भगृहात स्थित आहे आणि आतमध्ये शिल्पकलेचा एक खंडित भाग ठेवण्यात आला आहे. मंदिराला खांब असलेले कॉरिडॉर देखील दिलेले आहेत. हे मंदिर आणि बाओली नंतरच्या काळातील असल्याचे दिसते आणि ते ९व्या–१०व्या शतकात शैलीबद्ध जमिनीवर किंवा हेमाडपंती शैलीवर नियुक्त केले जाऊ शकते. तलावाची पाणी पातळी कधीही खाली जात नसल्याचा दावा स्थानिकांनी केला. हे महाराष्ट्रातील कमी शोधलेले ठिकाण आहे.

खेदाची बाब म्हणजे इतिहासाचा आणि वारशाचा एवढा महत्त्वाचा भाग देखरेखी अभावी आणि जतन करण्याच्या प्रयत्ना अभावी तुकड्या–तुकड्या नष्ट होत चालले आहे. भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाने ऐतिहासिक स्थळाचा जीर्णोद्धार, विकास आणि जतन करण्यासाठी पुढाकार म्हणून कार्यभार स्वीकारला आहे.

जैन मंदिरापासून पहिले डावीकडे (रामटेक मुख्य मंदिरात थांबण्याऐवजी). कडे जाणाऱ्या खडी रस्त्यावर पहिल्या उजवीकडे २ किमी (केवळ चालता येण्याजोगा रस्ता). कपूर बाओली मंदिर हे महाराष्ट्रातील नागपूर जवळील रामटेक येथील सर्व मंदिरांपैकी सर्वात प्राचीन मंदिर आहे. आर्किटेक्चर आणि डिझाइन या वस्तुस्थितीची साक्ष देतात. दुर्मिळ चमकदार दगड हे बांधकामाचे वैशिष्ट्य आहे. मंदिरातील पवित्र तलाव हे आणखी एक आकर्षण आहे. या तलावाची पातळी कधीही खाली जात नाही, असे सांगितले जाते. गावकर्‍यांच्या शब्दांत सांगायचे तर, एकेकाळी या मंदिराचा वापर सिंह, कोल्ह्यासारख्या वन्य प्राण्यांनी केला होता. ही एक प्राचीन बाओली (स्टेपवेल) आहे जी केवळ दगडांनी बनलेली आहे.

**रामटेक गड मंदिर :**

रामटेक हे नागपूरच्या ईशान्येस सुमारे दहा किलोमीटर अंतरावर आहे. या नावाचा अर्थ ‘‘रामाचा डोंगर‘‘ असाच होतो. सिंदूरगिरी किंवा शेंदराचा डोंगर व तपोगिरी किंवा तपस्या करण्याचा डोंगर नामाभिधान या डोंगरास पूर्वी असावे. तशा प्रकारच्या शिलालेख चौदाव्या शतकांतील लक्ष्मण मंदिराजवळ आहे. शहराच्या जवळ उंच टेकाडावर हा अनेक मंदिराचा समुच्चय आहे. टेकाडाची दक्षिण व पश्चिम बाजू नैसर्गिक रीत्याच संरक्षित आहे. उत्तरेकडे दुहेरी भिंत बांधून तटबंदी केली आहे. बाहेरील भिंत आधीच्या गवळी राजांनी बांधली असावी. तर बाकीचे इतर काम नंतरचे आहे. देऊळ पश्चिमेकडच्या सर्वात उंच भागात असून अंबाला तलावाच्या पश्चिम टोकाकडून टेकडीवर चढण्यास पायऱ्या आहेत. वर पोहोचल्यावर दगडी भिंत असलेले एक जुने तळे आहे. जवळच नरसिंहाची मोठी मूर्ती असलेले देऊळही आहे. रामटेक म्हणजे ‘रामाची टेकडी’ म्हणुन ओळखली जाते. रामाने वनवासकाळात या टेकडीवर काही काळ विश्रांती घेतली म्हणून यास रामटेक नाव पडले, असेही म्हटले जाते. या टेकडीवर विष्णूने हिरण्यकश्यपूचा वध केला व त्याच्या रक्ताने येथील दगड तांबडे झाले म्हणून यास ‘सिंदुरगिरी’ असेही नाव पडले आहे. ‘रामगिरी’, ‘तपोगिरी’, ‘काशीचे महाद्वार’ असेही याचे उल्लेख आहेत. ‘सिंदुरगिरी’ व ‘तपोगिरी’ ही दोन्ही नावे येथील लक्ष्मण मंदिरावरील कोरलेल्या एका यादवकालीन शिलालेखात (तेरावे शतक) आढळतात.

रामटेक या उंचीवर असलेल्या टेकडीवर चौदाव्या शतकातील बरीच मंदिरे आहेत. या टेकडीला चारी बाजूंनी कोट असून त्याला अनुक्रमे वराह, भैरव, सिंगपूर आणि गोकुळ असे चार दरवाजे आहेत. आवारात प्रथम दशरथ व वसिष्ठ मुनी यांची मंदिरे असून नंतर राम–सीतेचे मंदिर आहे, परंतु भक्तगण प्रथम धूम्रेश्वर महादेवाचे दर्शन घेऊनच श्रीराम मंदिरात दर्शनास जातात. राममंदिरात राम–सीता यांच्या काळ्या दगडातील, वनवासी वेषातील रम्य मूर्ती आहेत. त्या दुधाळे तलावात मिळाल्याचे म्हटले जाते. या मंदिरासमोरच लक्ष्मणाचेही मंदिर असून, गोकुळ दरवाजा व लक्ष्णण मंदिर यांवरील कोरीव काम विशेष लक्षणीय आहे. यांव्यतिरिक्त अन्य काही मंदिरेही आवारात आहेत. मंदिरासमोरच एक कुंड असून, ते सीतेची न्हाणी म्हणून ओळखले जाते. येथे रामनवमी व त्रिपुरी पौर्णिमा या दिवशी मोठ्या जत्रा भरतात टेकडीच्या पायथ्याशी एक जुने कलंकीचे मंदिर व मध्ययुगीन नागर शैलीत बांधलेली काही जैन मंदिरे आहेत.

रामटेकमध्ये माणिकताल व मथुरासागर अशा दोन बागा आणि ह्मक्त तलाव असून त्यांपैकी अंबाला तलाव सर्वांत मोठा आहे. या तलावाच्या काठावर आधुनिक पद्धतीने बांधलेली अनेक प्रेक्षणीय देवालये असून सकाळच्या प्रहरी या देवालयांवर सूर्यकिरणे पडून चमकू लागली म्हणजे

तलाव व देवालये यांचे एकंदर दृश्य अतिशय मनोहारी बनते. या मंदिरांमध्ये एक अप्रतिम सूर्य मंदिरही आहे. अंबाला तलावावर एकूण आठ घाट बांधण्यात आले असून त्यांना अष्टतीर्थांची नावे देण्यात आली आहेत.

तीर्थक्षेत्राखेरीज आसमंतीय मँगॅनीजच्या खाणी यांमुळे रामटेकला विशेष महत्व आले आहे. येथील पानमळे प्रसिद्ध असून ही पाने पुण्या–मुंबईला निर्यात होतात.

**निष्कर्ष :**

महाराष्ट्रात हेमाडपंती मंदिरे आजही मोठया प्रमाणात आढळून येतात.या मंदिरांची ठेवण बांधकाम इतके मजबूत आहे की की शेकडो वर्षे होउन सुद्धा ही मंदिर एक सांस्कृतिक ऐतिहासिक ठेवा म्हणून आपल्याला अभिमानास्पद आहे.भारतात इंग्रजांची सत्ता असताना त्यांनी अशा अनमोल ऐतिहासिक वास्तुचे जतन करण्यासाठी पुराण संशोधन विभाग स्थापन केला.परंतु स्वतंत्र भारतातील राज्यकर्त्यांने मात्र या ऐतिहासिक वास्तू जतन करता येत नाही. हे दुदैवच म्हणावे लागेल.

ऐतिहासिक वास्तुंचे जतन आणि पयर्टन दृष्टया त्यांचा विकास करणे हे शासनाचे धोरण असायला हवे. रामटेक गड मंदिर, आदासा मंदिर, टेकडी मंदिर पुरातत्व खात्याकडे आहे. परंतु विकासाचा अभाव असल्याने पर्यटकांची पावले या स्थळांकडे वळत नाही. खंडप्राय देशाला आपण अनेक बिरूदे लावली. परंतु त्याची साक्ष असलेल्या या वास्तु ,मंदिर यांची वाताहत होत आहे. ही मंदिरे संस्कृतीचा वारसा व अनमोल ठेवा आहे. हा ठेवा जतन करण्यासाठी शासनाने भरपूर निधी उपलब्ध करून देवून ही उपेक्षित झालेली स्थळ जतन करून पर्यटकांना आकर्षित करणे गरजेचे आहे.

**संदर्भ :**

Mr.m.wikipedia.org date/18/02/2022
Maharashtra information.in 19/02/2022.
Gramdevata savner hemadpanthi...Marathi.abplive.com
Mr.m.wikipedia.org.
Mr.vikaspedia.in.14/02/2022
डॉ. जोषी पी. एन. भारतीय मुर्तीषास्त्र महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ कंट्रोलर प्रकाशन समिती पुणे. ३०, १९७९
पाठक श. अरूणचंद्र महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर नागपूर जिल्हा भाग २ दर्शनिका विभाग महाराष्ट्र शासन २००५.
कामडी प्रज्ञा मध्यकालीन भारत में कला स्थापत्यकला एवं संस्कृती का इतिहास शिवांक प्रकाशन नई दिल्ली. २०२०.